## निशाणी ५ वरील आदेश

(दिनांक ०८ मे, २०२६ रोजी पारीत)

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादी यांचेविरुद्ध तुर्तातुर्त मनाई आदेश मिळण्याकरीता दाखल केला आहे.

०२. ज्या मिळकतीबाबत वादीने प्रस्तुत अर्जातून दाद मागितलेली आहे, त्या मिळकती म्हणजे

अ) जि.सोलापूर ता. पंढरपूर येथील मौजे गुरसाळे येथील

१) मिळकत गट नं.३२६/२ एकुण क्षेत्र ०२हे.०२आर. यापैकी वादी क्र.१ चे क्षेत्र ०१हे.५२आर. तसेच

२) गट नं.३२७ एकुण क्षेत्र ००हे. ८३आर. यापैकी वादी क्र. २ चे क्षेत्र ००हे. ५३आर.

येणेप्रमाणे वर्णनाच्या मिळकती ह्या वादी क्र. १ ते ३ यांच्या प्रत्यक्ष मालकी कब्जे, वहिवाटीच्या असून यातील सर्व झाड, झुडूप, दगड, माती, बांध, बंधारे, वृक्ष, पाषाण, घर, शेडनेट, नर्सरी, पाण्याचा हौद, पाण्याचे चेंबर, फ्रेश वॉल, ठिबक सिंचन, पाईपलाईन तसेच चालू पाण्याचे बोअरवेल व त्यावरील इलेक्ट्रीक मोटार कनेक्शनसह हा दाव्याच्या वादविषय आहे. तसेच

ब) जि. सोलापूर, सब जि. पंढरपूर पैकी मौजे गुरसाळे येथील शेतजमिन गट नं.३३० एकुण क्षेत्रफळ ०१हे. ०९आर. अर्जात नमुद केलेल्या चर्तुसिमेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही प्रतिवादी क्र. ३ यांच्या प्रत्यक्ष मालकी, कब्जे, वहिवाटीच्या

असून यातील सर्व झाड, झुडूप, दगड, माती, बांध, बंधारे, वृक्ष, पाषाण व इतर तदंगभुत वस्तु व हक्कासह. यास दावा मिळकत असे संबोधण्यात आलेले आहे.

०३. आपल्या अर्जातून वादीने असे कळविले आहे की, दावा कलम १अ क्र.१ गट नं.३२६/२, संपुर्ण क्षेत्र ०२ हे. ०२ आर. संपुर्ण मिळकत यातील वादी क्र. १ यांची वडिलोपार्जित अशी असून यातील वादी यांनी साधारण २२ वर्षांपुर्वी पैकी पुर्वेकडील क्षेत्र ००हे. ५०आर. ही मिळकत प्रतिवादी क्र. ४ नवनाथ मारुती गायकवाड यांना विक्री केली. सदर खरेदी विक्री नंतर गट नं.३२६/२ पैकी पश्चिमेकडील क्षेत्र ०१हे. ५२ आर. हे वादी क्र. १ यांच्या मालकी, हक्काने वहिवाटीस होते व आहे. सदरची मिळकत ही वादी क्र. १ हा दक्षिण उत्तर चालीने वहिवाटत होता व आहे.

०४. दावा कलम १अ अ. क्र.२ गट नं.३२७, संपुर्ण क्षेत्र ००हे. ८३आर. संपुर्ण मिळकत यातील वादी क्र. २ यांची वडिलोपार्जित अशी असून यातील वादी यांचे वडिल तुळशिराम शिंदे यांनी सदरची मिळकत वादी यांचे नावावर मागील ५० ते ६० वर्षांपुर्वी केली. त्यानंतर वादी क्र. २ यांनी गट नं.३२७ पैकी पश्चिमेकडील क्षेत्र ००हे. ३० आर. ही मिळकत प्रतिवादी क्र. ५ यांना विक्री केली. त्यानंतर प्रतिवादी क्र. ५ यांचेकडून गट नं.३२७ पैकी पश्चिमेकडील क्षेत्र ००हे. ३० आर. ही मिळकत प्रतिवादी क्र.६ प्रताप तुळशिराम शिंदे यांनी दि.२८.०५.२०१२ रोजी खरेदी घेतली. अशारितीने वादी क्र २ दावा कलम १अ अ क्र.२ गट नं.३२७ मधील पुर्वेकडील क्षेत्र ००हे. ५३आर. ही दक्षिण–उत्तर चालची मिळकत पुर्वीपासुन मालकी हक्काने, कब्जाने वहिवाटत होता व आहे.

०५. वादीचे पुढे कथन की, वर नमुद परिस्थीती असताना प्रतिवादी क्र. ३ यांनी तहसिलदार पंढरपूर यांचे कोर्टात रस्ता कलम १४३/एस.आर./१२/२०२१ नुसार प्रतिवादी क्र.३ यांची दावा कलम १ब म्हणजेच मिळकत गट नं.३३० या मिळकतीत जाणे येणे साठी यातील वादी क्र १ यांचे गट नं ३२६/२ व वादी क्र.२ यांचे गट नं.३२७ यांच्या मिळकतीच्या दरम्यान असलेल्या बांधावरुन उत्तर–दक्षिण चालीने १० फुट रस्त्याची मागणी केलेली होती.

०६. वादी पुढे असे कळवितात की, प्रतिवादी क्र. ३ यांनी तहसिलदार पंढरपूर यांचेकडील केलेल्या रस्ता केस क्र.१२/२०२१ ची सुनावणी होवून तहसिलदार पंढरपूर यांनी प्रतिवादी क्र.३ यांनी केलेल्या मागणीनुसार रस्ता केस क्र.१२/२०२१ बाबत तहसिलदार पंढरपूर यांनी दि.११.०५.२०२३ रोजी प्रतिवादी क्र.३ यांनी दिलेला अर्ज मंजूर करुन प्रतिवादी क्र. ३ यांचे जमिन गट नं.३३० मध्ये जाणे–येणेसाठी वादी क्र. १ व वादी क्र. २ यांच्या मालकीच्या गट नं.३२६/२ च्या पश्चिम बाजूच्या दक्षिण–उत्तर बांधाने व गट नं.३२७ च्या पुर्व बाजुच्या दक्षिण–उत्तर बांधाने नविन गाडी रस्ता गुरसाळे–पंढरपूर रस्त्यास मिळणरा असा रस्त्या बाबतचा आदेश दि.११.०५.२०२३ रोजी दिलेला होता.

०७. सदरच्या रस्त्याबाबत यातील वादी यांनी तहसिलदार, पंढरपूर यांच्याकडील दि.११.०५.२०२३ रोजीचा आदेश हा उप विभागीय अधिकारी, पंढरपूर यांच्याकडे आर.टी.एस. अपिल क्र.२६३/२०२३ हे दाखल करुन आव्हानीत केलेला होता. सदरचे अपिलाची सुनावणी होवून उप विभागीय अधिकारी, पंढरपूर यांनी तहसिलदार, पंढरपूर यांचेकडील रस्ता कलम १४३/एसआर/१२/२०२१ मधील दि.११.०५.२०२३ रोजीचा निर्णय उप

विभागीय अधिकारी, पंढरपूर यांनी दि.१५.०१.२०२४ रोजी रद्द केला. त्यानंतर प्रतिवादी क्र.३ यांनी उप विभागीय अधिकारी, पंढरपूर यांचेकडील दि.१५.०१.२०२४ रोजीचा आदेश अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे न्यायालयात आर.टी.एस. दुसरे अपिल क्र.४३/२०२४ हे अपिल दाखल करुन आव्हानीत केले. ते अपील कशा प्रकारे मंजुर करण्यात आले व त्या निर्णयाच्या विरूध्द कश्या प्रकारे पुर्नविलोकन अर्ज दाखल झाले याबाबत वादीने आपल्या अर्जातुन सविस्तर नमुद केलेले आहे.

०८. वादीचे पुढील कथन की, वादी क्र. १ व २ यांना कायदयातील तरतुदींचे, नियमांचे, कलमांचे सखोल ज्ञान नाही, त्यांना व्यवस्थीत लिहिता, वाचता येत नाही. त्यांनी प्रतिवादी सोबत स्वमर्जीने कोणतीही तडजोड केलेली नाही. त्यामुळै आर टी एस दुसरे अपीलाचे कामी जे काही निष्कर्ष नोंदविण्यात आले ते अयोग्य व चुकीचे आहे. तसेच सदर अपीलामध्ये प्रतिवादींची मागणी विचारात न घेता, मागणी नसलेला आदेश म्हणजेच मे.तहसिलदार यांचा आदेश कायम करण्यात आला आहे. तो आदेश चुकीचा अयोग्य असुन वादीचे कधीही भरून न येणारे नुकसान होणार आहे. प्रस्तुत कामी वादीने सकृत दर्शनी केस सिध्द केलेली असुन न्यायाचा समतोल वादीचे बाजुने आहे. प्रस्तुतचा तुर्तातुर्द ताकीदीचा अर्ज मंजुर केलेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. यदाकदाचित प्रस्तुतचा अर्ज नामंजुर झाल्यास वादी यांचे मोठया प्रमाणे शेतजमिनीचे नुकसान होणार आहे. त्याअनुषंगाने वेगवेगळे मागण्यांचे वेगळे दावे दाखल होतील. सदर प्रकरणी गुंतागुंत होईल, वेळप्रसंगी मारहाण होउन अनेक वेगवेगळया चित्र, विचीत्र घटना घडण्याची परिस्थिती निर्माण होईल याचे कारण यातील प्रतिवादी हा तहसिलदार साहेबांच्या आदेशाच्या जोरावर व राजकीय व गुंड प्रवृत्तीच्या सानिध्यात असल्याने तो बळाचे जोरावर वादी यांचे मिळकतीत घुसुन

मिळकतीची नुकसान करून सदर मिळकत वर नमुद केलेप्रमाणे पडीक पडुन वादीचे कधीही भरून न येणारे नुकसान होणार आहे. वादीस सकृतदर्शनी केस आहे, न्यायाचा समतोल देखील वादीचे बाजूने आहे. तरी अर्ज मंजूर करण्यात यावा, अशी विनंती वादी तर्फे करण्यात आला आहे.

०९. प्रतिवादी क्र १ व २ यांनी नि २८ वर आपला खुलासा दाखल करून मे.तहसिलदार यांचेकडील दि ११/०५/२०२३ रोजीचा आदेश योग्य व बरोबर असल्याचे नमुद केले आहे. त्यांचे कथनानुसार प्रतिवादी क्र ३ यांनी पुर्नविलोकन अर्ज नं ५/२०२४ हे जे अपील दाखल केलेले आहे. त्या अर्जाची चौकशी प्रलंबित असल्यामुळे यातील वादी ने दाखल केलेलो प्रस्तुतचा दावा हा फेटाळण्यास पात्र असुन सदर अर्ज नामंजुर करावा अशी विनंती प्रतिवादी क्र १ व २ यांनी केलेली आहे.

१०. प्रतिवादी क्र.३ यांनी नि.४० वर आपला खुलासा दाखल करून वादीचा दावा कायदयाप्रमाणे या न्यायालयात चालू शकत नसल्याचे कथन करण्यात आले आहे. प्रतिवादी पुढे असे कथित करतात की, वादीचा दावा दावा हाच मुलत: बेकायदेशीर असलेने त्याकामी दाखल केलेला तुर्तातुर्त ताकीद अर्ज हा विना विलंब रद्द होणेस पात्र आहे. वादी यांना अशा स्वरुपाचा दावा दाखल करणेचा कोणत्याही स्वरुपाचा कायदेशीर हक्क अथवा अधिकार नाही. सबब हया कामी दाखल केलेला तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज विना विलंब रद्द होणेस पात्र आहे. वादी यांनी दाखल केलेला सदरचा दावा हा प्रतिवादी क्र. ३ यांचे कायदेशीर हक्क व अधिकार प्रतिबंधित करणेकामी दाखल केलेला असून सदर कामी दाखल केलेला तुर्तातुर्त ताकीद अर्ज हा सदर दाव्याचाच भाग असलेने तो विना विलंब रद्द होणेस पात्र आहे. वादींना अशा

स्वरुपाचा दावा दाखल करण्यास कोणत्याही स्वरुपाची लोकस स्टॅन्डी नाही. सबब सदर कामी दाखल केलेला तुर्तातुर्त ताकीद अर्ज हा कायदयाप्रमाणे चालू शकत नाही.. वादी यांनी सदर दावा व तुर्तातुर्त ताकीद अर्ज दाखल करत असताना अनेक महत्वाच्या गोष्टी या न्यायालयासमोर लपवून ठेवल्या आहेत. सबब सदरील वादी हे तुर्तातुर्त ताकीदीची मागणी करणेस कायदयाप्रमाणे पात्र नाहीत. वादी यांनी यापुर्वी दिवाणी न्यायाधिश कनीष्ठ स्तर यांचे न्यायालयामध्ये रे.मु.क्र.५४२/२०२३ हा दावा दाखल केलेला होता. सदर दाव्यामध्ये व तुर्तातुर्त ताकीद अर्जामध्ये उपस्थित केलेले वादकथन हे एकच आहे. अशा परिस्थतीमध्ये वादी यांना सदरचा दावा हा दाखल करणेचा कोणत्याही स्वरुपाचा कायदेशीर हक्क अथवा अधिकार नाही. वादी यांनी रे.मु.क्र.५४३/२०२४ बाबतची माहिती या न्यायालयासमोर हेतु परस्सररित्या या न्यायालयासमोर दाखल दडवून ठेवलेली आहे व तुर्तातुर्त ताकीदचा अर्ज या न्यायालयासमोर दाखल केलेला आहे. सदरील माहिती झाकून ठेवून काही गैरआदेश न्यायालयाकडून प्राप्त करता आले तर पहावे या हेतूने वादी यांनी सदरील दावा व तुर्तातुर्त अर्ज रचला आहे तरी तो रद्द करावा अशी विनंती केली आहे.

११. प्रतिवादी पुढे असे कळवतात की, सदरील प्रतिवादी क्र.३ यांचे मालकी हक्क वहिवाटीची मौजे. गुरसाळे , ता. पंढरपूर, जि. सोलापूर येथे शेत जमिन गट नं.३३० ही असून सदर शेत जमिनीमध्ये जाणे येणेसाठी शेतजमिन कसण्यासाठी शेतजमिनीमधील पिकांची ने–आण, काढणी, देखभाल इ. साठी कोणत्याही स्वरुपाचा हक्काचा असा रस्ता उपलब्ध नसल्याने व परिसरातील संपुर्ण शेतजमिनीचे बागायतीकरण झालेने आजुबाजूला कोणत्याही स्वरुपाची जिराईत व पडीक शेतजमिन परसिरामध्येच न राहिलेने सदर शेतजमिनीमधून बाहेर पडणे जिकरीचे झाले होते. प्रतिवादीना कोणत्याही स्वरुपाचा जाणे–येणेचा रस्ता उपलब्ध नसलेने

सदरील प्रतिवादी क्र. ३ याने परिसरातील मुख्य रस्ता असणारा गुरसाळे मेंढापूर या रस्त्यास लागणे कामी शेतजमीन गट नं.३२७ च्या पुर्व बाजुने व शेतजमिन गट नं.३२६/२ चे पश्चिम बाजूने बांधाने दक्षिणोत्तर चालीचा १० फुट रुंदीचा रस्ता मागणी करणारा दावा मा. तहसिलदार पंढरपूर यांचेकडे महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम कलम १४३ प्रमाणे दाखल केलेला होता. सदर दाव्याची गुणावगुणांवर चौकशी होऊन सदरील दाव्याचे कामातील वादी व प्रतिवादी यांना पुरेशी संधी देऊन कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करुन दोन्ही बाजुकडून पुरावे बंद केले नंतर युक्तीवादाअंती दि.११.०५.२०२३ रोजी तहसिलदार पंढरपूर यांनी सदरील दावा क्र. रस्ता/कलम/१४३/एस.आर.१२/२०२१ हा अंतीम न्यायनिर्णित केला. महसुल न्यायाधिकरणामध्ये वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान कोणकोणत्या कारवाया झाल्या याचे सविस्तर वर्णन प्रतिवादी यांनी आपल्या म्हणणेतुन केले आहे.

१२. प्रतिवादीने पुढे असे नमुद केले आहे की, कोणत्याही योग्य कायदेशीर व संयुक्तीक कारणाशिवाय सदरील प्रतिवादी क्र. ३ यांची दारकोंडी अविरतपणे चालू राहावी व महसुली न्यायधिकारणाचे न्यायकक्षेमध्ये हस्तक्षेप करावा या गैरहेतूने वादी यांनी सदरील दावा व तुर्तातुर्त ताकदीचा अर्ज दाखल केला असून सदरील दावा व तुर्तातुर्त ताकीद अर्ज कायदयाप्रमाणे या न्यायालयात चालू शकत नाही. सदरील वादी दावा कलम १८ मध्ये नमुद केलेले ठिकाणाहून कोणत्याही स्वरुपाचा रस्ता नसुन सदर ठिकाण हे सदर परिसरामधील व पंचकृषीतील निसर्गचक्रातील पाणी, नैसर्गिकरित्या, वाहून नेणारा, पाण्याचा प्रवाह म्हणजे ओढा आहे. अशा स्वरुपाचा ओढयामधूनअथवा बाजुने कोणत्याही स्वरुपाचा जा–ये करण्याचा मार्ग किंवा रस्ता अस्तित्वात असू शकत नाही अथवा सदरील वादी दावा कलम १७ मध्ये नमुद करतात त्याप्रमाणे कोणत्याही स्वरुपाचा रस्ता अथवा मार्ग सदर ठिकाणाहून

अस्तित्वात नाही केवळ सदरील प्रतिवादी क्र.३ यांची दारकोंडी करावी व प्रतिवादी नं.३ अवलंबित असलेली कायदेशीर प्रक्रिया ही गैर हेतूने व बेकायदेशीरपणे बाधित करावी याच हेतूने सदरील वादी अतिशय चुकीचे व लबाडीची कथने सदर कामी करत आहे. प्रतिवादी पुढे असे नमुद करतात की, केवळ सदर प्रतिवादी यांचे सदरील कायदेशीर प्रयत्न प्रतिबंधीत करण्याच्या हेतूने व महसुली न्यायाधिकरणावर दबाव निर्माण करण्याच्या हेतूने दाखल केलेला तुर्तातुर्त ताकीद अर्ज रद्द केलेने सदरील वादीचे कोणत्याही स्वरुपाचे नुकसान होणार नाही. तुर्तातुर्त ताकीद अर्ज मंजूर झालेस या प्रतिवादीचे पैशाच्या स्वरुपात कधीही भरुन न येणारे नुकसान होणार असून कायदेशीर प्रक्रिया प्रतिबंधित होणार आहे. अशा परिस्थितीमध्ये वादी यांनी दाखल केलेला तुर्तातुर्त ताकीद अर्ज रद्द होणे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे झालेले आहे. सदरचा अर्ज रद्द झालेस या न्यायालयास मुळ दाव्याची गुणावगुणावर चौकशी करणेस मदत होणार आहे. सदरील वादीने या प्रतिवादीचे विरुध्द खोटा व लबाडीच्या मजकुराच्या आधारे नाहक व विनाकारण सदरील दावा या न्यायालयात दाखल केलेला असून सदर दाव्याच्या कामी हजर होणेस भाग पाडून सदरील प्रतिवादीस नाहक व विनाकारण आर्थिक खर्चास व मानकिस त्रासात पाडले आहे. सबब सदरील दावा व ताकीद अर्ज रद्द करणेत येवून वादीस कॉम्पॅसेंटरी कॉस्ट ५०,०००/- करणेत येऊन सदरील रक्कम सदर प्रतिवादीस देवविण्यात यावी. प्रतिवादी क्र ३ यांनी वादी यांनी दाखल केलेला तुर्तातुर्त अर्ज खर्चासह रद्द करणेत यावा अशी विनंती केली आहे.

१३. वादी व प्रतिवादी यांच्या कथनाच्या अनुषंगाने माझे विचारार्थ अर्जाच्या निर्णयाकरीता खालील वादप्रश्न उपस्थित होतात. त्यावरील माझे निष्कर्ष हे यानंतर नमूद केलेल्या कारणमिमांसेला अनुसरून पुढीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ. क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने प्रथमदर्शनी केस त्यांच्या बाजूने असल्याचे सिद्ध केले आहे काय ? | **होय** |
| २. | न्यायाचा समतोल हा वादीच्या बाजूने आहे काय ? | **होय** |
| ३. | अंतरिम मनाईहुकुम मिळाला नाही तर त्यांचे अपरिमित असे नुकसान होईल, हे वादीने सिद्ध केले आहे काय ? | **होय** |
| ४. | अंतिम आदेश काय ? | **अर्ज मंजुर करण्यात येतो.** |

**:कारणमिमांसा:**

१४. दोन्ही पक्षकारांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. दाव्याच्या कामी दाखल असलेल्या कागदपत्रांची पाहणी केली.

**वादप्रश्न क्र. १ ते ३ करीता –**

१५. सदरचे मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्यांची चर्चा एकत्रितरीत्या करण्यात येत आहे. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने उपस्थित झालेल्या वादग्रस्त मुद्दयांकडे वळण्यापूर्वी वादीने आपल्या अर्जातून प्रतिवादी विरूध्द कोणती विनंती केली आहे हे पाहणे गरजेचे आहे. वादीने आपल्या अर्जातुन मा.तहसदिार साहेब यांचे रस्ता केस क्र १२/२०२१ मधील दि ११/०५/२०२३ रोजीच्या आदेशाचा आधार घेउन प्रतिवादी क्र ३ यांनी प्रतिवादी क्र २ यांच्या आदेशाच्या जोरावर वादी यांचे दावा मिळकतीतील शांततापुर्ण कब्जे, वहीवाटीस हरकत, अडथळा करू नये व सदर आदेशाच्या जोरावर त्यांनी नसलेले हक्क दावा मिळकती मध्ये प्रस्थापित करू

नये म्हणुन प्रतिवादी यांचे विरूध्द तुर्तातुर्द ताकीद देणेत यावी, अशी विनंती केली आहे.

१६. दोन्ही पक्षकरांचे विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. दोन्ही पक्षकारांतर्फे दाखल असलेल्या कागदपत्रांची पाहणी केली, वादीचे विद्वान वकीलांनी आपल्या युक्तीवादातुन वादीनी, वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान महसुल न्यायाधिकरण यांचेकडे दावा मिळकतीतून प्रतिवादी क्र. ३ यास जो रस्ता मंजूर करण्यात आला त्याबाबत कोणकोणती प्रकरणे झाली याचा उहापोह केलेला आहे. ते पुढे असे नमुद करतात की, प्रतिवादी क्र. २ यांनी प्रतिवादी क्र. ३ यांना दावा मिळकतीतून जो रस्ता मंजूर केलेला आहे, तो आयोग्य व बेकायदेशीर आहे. सदर रस्त्यामुळे वादीचे मिळकतीचे कसे नुकसान होणार आहे याबाबत त्यांनी कथन केले आहे. आपल्या युक्तीवादातुन त्यांनी पुढे असे कळविले आहे की, प्रतिवादी क्र. ३ यास त्याचे शेतामध्ये जाण्यासाठी गट नं.३३० पूर्व बाजूस व गट नं.३१९ च्या पश्चीम बाजूस दक्षिण उत्तर चालीचा वहिवाटीचा रस्ता असून, सदरचा रस्ता हा पुढे जावून कॅनाल रस्त्याला जाउन मिळतो याबाबत वादीने कळविले आहे. सदरचा नियोजीत रस्ता मंजूर करते वेळी आयोग्य प्रकारे झालेला पंचनाम्यावर विसंबून प्रतिवादी क्र. २ यांनी आयोग्य पद्धतीने रस्ता मंजूर केला. सदर रस्त्यामुळे वादीच्या मिळकतीमध्ये असलेले पिकांचे व इतर प्रयोजनांचे कशा प्रकारे नुकसान होणार आहे याबाबत वादीचे विदवान वकीलांनी कळविले आहे. त्यांचे पुढे म्हणणे की, सदरचा रस्ता मंजूर करतेवेळी वादीचे किती मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे याबाबत प्रतिवादी क्र. २ यांनी कोणतीही शहनिशा केलेली नाही. तरी वादीस सकृतदर्शनी केस आहे. न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने झुकणारा आहे. अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे असे नुकसान आहे. तरी अर्ज मंजुर करण्यात यावा, अशील विनंती वादीचे वतीने करण्यात आलेली आहे.

१७. प्रतिवादीच्या विद्वान वकील आपल्या युक्तीवादातुन असे संभोधन केलेले आहे की, मे.तहसिलदार यांचे आदेशावर वादी क्र. १व २ यांनी नाराज होऊन मा. उप विभागीय अधिकारी, पंढरपूर यांचेकडे आर.टी.एस. अपील क्र. २२६/२०२३ हे दाखल केले. मा. उप विभागीय अधिकारी पंढरपूर यांनी खालील न्यायालयाचे कोणत्याही कागदपत्राचे अवलोकन न करता केवळ सदर दाव्याचे कामातील वादी यांचे म्हणणेवर विसंबून राहून सदरील अपील दि.१५.०१.२०२४ रोजी मंजूर करणारा निर्णय पारीत केला व मा. तहसिलदार पंढरपूर यांनी दि.११.०५.२०२३ रोजी पारित केलेला न्यायनिर्णय रद्द केला. सदर आदेशावर नाराज होऊन सदरील प्रतिवादी क्र. ३ यांनी मा. अप्पर जिल्हाधिकारी सोालपूर यांचकडे आर.टी.एस.अपील नं.४३/२०२४ हे दाखल केले व सदर अपीलाचे चौकशीचे कार्यकालामध्ये सदरील वादी व प्रतिवादी क्र. ३ तसेच सदरील प्रतिवादी क्र. ३ यांची मिळकत असणारे परिसरातील शेतजमिनींना जाणे येणेसाठी रस्ताच उपलब्ध नसलेने सदर शेतजमिन धारक शेतकरी यांचेमध्ये तंटामुक्त समिती तसेच गावामधील प्रतिष्ठीत लोक यांची तडजोड घडवून आणली. सदरील तडजोड ही सदरील वादी नं. १ व २ यांचे ईच्छेप्रमाणे झालेली असलेने व रस्त्यासारख्या संवेदनशिल विषयावर कोणत्याही स्वरुपाचा वाद नको व रस्ता होतो आहे या हेतुने सदरील वादीने सदरील तडजोडीस मान्यता दिली. सदरील तडजोड सदरील वादी नं. १ व २ यांनी मा. अप्पर जिल्हाधिकारी यांचेसमोर उपस्थित राहून सदरील नेमलेले तारखेस दाखल केली व तशा स्वरुपाचा महसुल न्यायाधिकरण कोर्ट रोजनामा मा. अप्पर जिल्हाधिकारी यांनी स्वत:चे हस्तांक्षरात लिहून ठेवला व सदरील वादी नं. १ व २ यांनी दाखल केलेले तडजोडीस अनुसरुन मा. अप्पर जिल्हाधिकारी यांनी सदरचे अपील पटलावरुन काढून टाकले.

१८. प्रतिवादीचे विद्वान वकीलांनी आपल्या युक्तीवादातून पुढे असे नमुद केले आहे की, वास्तविक पाहता तडजोड पुरसीस व तडजोड कागदपत्र यास अनुसरुन तसे आदेश सदर कामी होणे प्रचलित कायदेशीर तरतुदीप्रमाणे आवश्यक होते. परंतु अनावधानाने मा. अप्पर जिल्हाधिकारी सोलापूर यांनी अपीलाचे कामी तडजोडे पुरसीस प्रमाणे स्वयस्पष्ट आदेश होणे आवश्यक असताना सदर कामी तडजोड झाली असलेचे सदरचे अपील काढून टाकण्यात येत आहेख, अशा स्वरुपाचे गैरलागू आदेश पारित झाले. सदर आदेशाची नोटीस सदरील वादी नं. १ व २ यांना मिळताच पुन्हा सदरील वादी नं. १ व २ यांची विकृतवृत्ती पुढे आली व पुन्हा सदरील प्रतिवादी नं.३ यांची सदर बाबीचा गैरफायदा घेऊन दारकोंडी करावी या हेतूने सदर तडजोडीबाबत व मे. अप्पर जिल्हाधिकारी यांचे आदेशाबाबत गैर अर्थ काढणेस सुरुवात केली. सबब सदरील प्रतिवादी क्र. ३ यांनी मे. अप्पर जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडे सदर आदेशाची पुनर्विलोकन होणेकामी अर्ज सादर केला व त्याचे कामकाज मा. अप्प. जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडे न्यायप्रविष्ठ आहे. या ठिकाणी नमुद करणे गरजेचे आहे की, प्रस्तुतचा अर्जाचे चौकशी दरम्यान सदर पुर्नलोकन अर्ज निकाली काढण्यात आला असून त्याची प्रत वादीने दाखल केली आहे. तो अर्ज निकाली काढतेवेळी मे.तहसिलदार यांचेकडील आदेश कायम करण्यात आलेला आहे.

१९. वादीचे विद्वान वकीलांनी आपले युक्तीवादातुन असे नमुद केले आहे की, प्रतिवादी क्र ३ हा धुर्त, चाणाक्ष व लबाड असुन तो रस्ता केस नं १२/२०२१ मधील निकालाचे आधारे वादी यांच्या मिळकतीच्या सामाईक बांधावरून दक्षीण – उत्तर चालीचा नवीन तथाकथीत रस्ता मे.तहसिलदार साहेब यांचे आदेशाप्रमाणे तयार करण्याच्या प्रयन्तात आहे व तश्या हालचाली त्यांनी चालु केलेल्या आहेत. असे झाल्यास वादीचे मिळकतीचे सामाईक बांधावर असलेले फळ झाडे पाण्याचा

हौद, पाण्याचे चेंबर, ठिबक सिंचन साहित्य व मिळकतीमध्ये उभी असलेली पिके, नेट व घरे उदवस्त होउन पाण्याचे चालु बोअर वेल व त्यावरील इलेक्ट्रीक मोटारीचे देखील नुकसान होणार आहे. प्रतिवादी क्र ३ यास त्याच्या मिळकतीमध्ये जाण्यास पुर्वापार असे दोन रस्ते आहेत. मात्र महसुल अधिकारी यांचेशी हातमिळवणी करून प्रतिवादीने रस्ता केस नं १२/२०२१ मध्ये त्याचे लाभात आदेश पारित करून घेतलेले आहे. त्या आदेशामध्ये वादीच्या जमीनीच्या होणारे नुकसानीचे कोणताही विचार करण्यात आलेला नाही. त्यामुळे तो आदेश अन्यायकारक असल्यामुळे वादीस प्रस्तुतचा दावा दाखल करून सदर अर्जाद्वारे प्रतिवादी यांचे विरूध्द तुर्तातुर्द मनाई आदेशाची मागणी करणे क्रमप्राप्त झाले आहे.

२०. प्रतिवादीचे विद्वान वकीलांनी आपल्या युक्तीवादातुन असे कळविले आहे की, सदरी प्रतिवादी नं.३ यांची शेतजमिन गट नं.३३० ही बागायती असलेने व परिसरामधील संपुर्ण शेतजमिन बागायती झाल्याने सदरील प्रतिवादी नं.३ यांना बाहेर पडणेकामी सध्या कोणत्याही स्वरुपाचा मार्ग अथवा रस्ता अस्तित्वात नाही अशा परिस्थितीमध्ये सदरील वादी यांनी अतिशय खोटया व लबाडीच्या मजकुराच्या आधारे सदरील दावा व तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज दाखल केला आहे. सदरील प्रतिवादी यांनी या न्यायालयासमोर सत्य वस्तुस्थिती मांडली असून न्यायाचा तराजू हा या प्रतिवादीचे बाजुने आहे. सदरील वादीचे वर्तन पाहता वादीने या न्यायालयासमोर अने महत्वाच्या गोष्टी लपवून ठेवल्या आहेत. सदर दाव्याचे कामी सदरील प्रतिवादीस हमखास अशा यशाची खात्री आहे. सदरील प्रतिवादी हा कायदेशीर तरतुदींप्रमाणे शेतरस्त्यासाठी असणारे सक्षम न्यायाधिकरणापुढे आपली बाजू मांडत आहेत. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे.

२१. प्रस्तुत प्रकरणात नोंद घेण्यासारखी बाब म्हणजे मा. अप्पर जिल्हाधिकारी यांचेकडे वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान झालेल्या तडजोडीच्या अनुषंगाने अपील मंजूर करावे अशी प्रतिवादींना विनंती केली होती. त्या विनंती ची दखल दोन्हही पुनर्वालोकन अर्जाच्या कामी विचारात घेतलेली नाही असे दिसते. तर तहसीदार यांनी दिलेला आदेश हा कायम करण्यात आलेला आहे. त्याच आदेशाच्या विरुध्द नाराज होऊन वादीने प्रस्तुत दावा दाखल केलेला आहे. ज्या पंचनाम्याच्या आधारे मे.तहसिलदार यांनी निकाल दिलेला आहे तो पंचनामा योग्य व कायदेशीर नाही असे वादीचे म्हणणे आहे. सदर निकालपत्रात मा. तहसीलदार यांनी प्रतिवादीस पर्यायी रस्ता नसलेचे नमुद केलेले आहे. मात्र पंचनाम्यात त्या बाबत कोणतेही भाष्य करण्यात आलेले नाही. प्रस्तूत प्रकरणात प्रतिवादी यांनी स्थळ पाहणी होण्यासाठी स्वत:हून कोर्ट कमीशनचा अर्ज दाखल केला आहे. मात्र त्या आर्जची चौकशी अद्याप झालेली नाही. वादीतर्फे या कामी जी कागदपत्रे दाखल झालेली आहेत त्यामध्ये मिळकतींचे उतारे, महसूल न्यायाधीकरण यांच्याकडील अर्ज व त्यावरील निकाल, तसेच वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतीचे व प्रतिवादीस असलेल्या तथाकथीत पर्यायी रस्त्याचे छायाचित्र दाखल केलेले आहे. आपल्या युक्तीवादातून प्रतिवादीचे विद्वान वकीलांनी या गोष्टीवर भर दिला की सदर कॅनालच्या बाजूने जाणा-या रस्त्याचा उल्लेख वादी ठिकठिकाणी करत आहे, तो रस्ता कॅनालच्या पूर्वेला नसून पश्चीमेला आहे. त्यामुळे पर्यायी रस्त्याबाबत वादीने जे काही कथन केले आहे ते योग्य नाही. याशिवाय वादींच्या दावा मिळकतीमधील बांधालगत ज्या काही सुधारणा झालेल्या आहेत, त्या सुधारणा वादीने सदर रस्ता मंजूर झाल्यानंतर केलेल्या आहेत असे प्रतिवादीचे म्हणणे आहे.

२२. त्यांच्या मालकीच्या गट नं.३३० मध्ये जाण्यासाठी मंजूर केलेल्या रस्त्याव्यतीरीक्त इतर कोणताही सोयीचा रस्ता नाही असे प्रतिवादीचे म्हणणे आहे. त्यामुळे सदर रस्त्याबाबत कोणताही तूर्तातुर्त आदेश झाल्यास त्यांचे अपरीमीत नुकसान होणार आहे, त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी प्रतिवादीची विनंती आहे. प्रतिवादी स्वत:हून मान्य करतात की मागील २० वर्षांच्या कालावधीपासून ते

त्यांची दावा  जमीन कसत आहेत. मात्र त्यांच्या कथनानुसार त्यांच्या आजूबाजूच्या मिळकती बागायती झाल्यामुळे त्यांच्या शेतामध्ये शेतमालाची ने-आण करण्यासाठी व शेतजमीन कसण्यासाठी सुगम  रस्त्या आभावी अडचणीचे झालेले आहे. वादीने याकामी जे छायाचित्र दाखल केले आहे त्यात आढळून येत असलेला रस्ता हा प्रतिवादीचे मिळकतीकडे जाणारा रस्ता असल्याची बाब प्रतिवादीने नाकारली आहे. मात्र त्या रस्त्याला लागून असलेली घर मिळकत त्यांची  असल्याचे बाब त्यांनी नाकारलेली नाही. असे असले तरी ह्या छायाचित्रांमध्ये दर्शविण्यात आलेला रस्ता हा प्रतिवादींना उपलब्ध असलेला पर्यायी रस्ता असल्याचे जरी ग्राह्य धरले तरी हा रस्ता एक सारखा नसून तो खाचखळग्यांचा व गैरसोयीचा असल्याचे प्रथमदर्शनी अढळून येते. अशा वेळी या कामी कोर्ट कमीशनचे काम होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी प्रतिवादीनी त्यांचा कोर्ट कमीशनचा अर्ज चालवून योग्य ते आदेश प्राप्त करुन घेणे गरजेचे आहे.

२३.		प्रतिवादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला आहे की, त्यांना सदर रस्त्याची तातडीने आवश्यकता आहे. त्यामुळे कोर्ट कमीशनचे काम करुन घ्यावयाचे झाल्यास प्रस्तूत प्रकरणाच्या चौकशीचे कामी अजून विलंब लागण्याची शक्यता आहे. मात्र कोर्ट कमीशन अर्जाचे काम व दाव्याचे चौकशीचे काम तातडीने चालवावे असा अर्ज प्रतिवादीस करता येईल. कोर्ट कमीशनचे काम होणे याकामी अत्यंत आवश्यक आहे. सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे, प्रतिवादींचे म्हणणे, महसुल अधिका-यांचे आदेश तसेच प्रत्यक्ष परिस्थिती विचारात घेता, प्रतिवादीने मांडलेला रस्ता हक्काचा दावा प्रथमदर्शनी पुर्णपणे सिद्ध होत नाही. तथापि संबंधित मिळकतींमध्ये जाणे-येणे, शेती मशागत, पिकांची वाहतूक तसेच दैनंदिन वापरासाठी सुलभ मार्गाची आवश्यकता असल्याचे निदर्शनास येते. तसेच वादग्रस्त मार्गाबाबत दोन्ही पक्षामध्ये दीर्घकाळ वाद सुरु असून पर्यायी मार्ग उपलब्ध आहे किंवा नाही याबाबत अंतिम निष्कर्षाचे वेळी सविस्तर पुराव्यावरच निश्चित होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर संबंधित अधिका-यांनी दिलेल्या आदेशांमध्ये काही त्रुटी, परिस्थितीचे अपूर्ण परीक्षण तसेच प्रत्यक्ष पाहणीतील

विसंगती आहे असे वादीचे म्हणणे आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर केल्यास वादीस अपरिमित हानी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने व भविष्यातील वाद टाळण्याच्या उद्देशाने सदर अर्ज मंजूर करणे गरजेचे आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजुर झाल्यास प्रतिवादीचे कोणतेही अपरिमीत नुकसान होणार नाही. त्यामुळे अर्ज मंजुर करण्याइतपत सकृतदर्शनी केस वादीचे बाजुने आहे व न्यायाचा समतोल देखील वादीचे बाजुन झुकणारा आहे. म्हणुन मी मुद्दा क्र १ ते ३चे उत्तर होकारार्थी देत असुन मुद्दा क्र ४ चे उत्तर देण्यासाठी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादीचा अर्ज पुढीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांना असा तुर्तातुर्त मनाई आदेश देण्यात येत आहे की त्यांनी दाव्याचा अंतीम निकाल लागेपर्यंत दावा मिळकतीमधून कोणताही नव्याने रस्ता निर्माण करू नये.

३. वादी यांना असे आदेश देणेत येत आहे त्यांनी प्रस्तुतचा दावा तातडीने चालवून घ्यावा.

SARIKA SANDEEP PAKHALE
Digitally signed by SARIKA SANDEEP PAKHALE
Date: 2026.05.12 15:32:14 +0530

दि. ०८/०५/२०२६ (श्रीमती एस. एस. पाखले)

दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,

पंढरपूर.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | A. I. Khan (Steno G-II). |
| Court | - | Civil Judge, Senior Division, Pandharpur. |
| Date of Judgment/Order | - | 08.05.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 12.05.2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 12.05.2026 |